# बोर्ड प्रश्नपत्रिका : ऑक्टोबर २०१४

**वेळ: २ तास** **एकूण गुण: ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
iii. प्र. ३(अ) साठी पुरविण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडा.
iv. प्र. ३(क) साठी पुरविण्यात आलेल्या नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडा.
v. नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
vi. आवश्यक तेथे सुबक आकृत्या काढा व नकाशाचा वापर करा.

१. **(अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा :** [३]

i. नर्मदेच्या दक्षिणेला असलेल्या त्रिकोणी प्रदेशाला ________ चे पठार म्हणतात.
(माळवा, बुंदेलखंड, छोटा नागपूर, दख्खन)

ii. क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारत हा जगातील ________ क्रमांकाचा मोठा देश आहे.
(पाचव्या, सहाव्या, सातव्या, चौथ्या)

iii. वाराणसी ________ साठी प्रसिद्ध आहे.
(सुती साड्यां, लोकरीच्या कपड्यां, रेशमी साड्यां, चामड्याच्या वस्तूंच्या निर्मिती)

**(ब) 'अ' स्तंभातील घटकांशी 'ब' स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा :** [३]

| | **'अ' स्तंभ** | | **'ब' स्तंभ** |
|---|---|---|---|
| i. | गुरूशिखर | अ. | मध्य प्रदेश |
| ii. | विंध्याचल | ब. | पश्चिम घाट |
| iii. | छोटा नागपूर | क. | अरवली पर्वत |
| | | ड. | खनिज संपत्तीने समृद्ध |

२. **(अ) पुढील विधानांची भौगोलिक कारणे द्या (कोणतीही दोन) :** [४]

i. गंगेच्या मध्य मैदानी प्रदेशातील मृदा अपरिपक्व आहे.
ii. हिमालयीन प्रदेशात भारताकडील भागात पर्जन्यवृष्टी होते, तर तिबेट शुष्क प्रदेश आहे.
iii. राजस्थानचे वाळवंट पर्यटकांना आकर्षित करते.
iv. दख्खन हे अनेक भाषा व वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांचे माहेरघर आहे.

**(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही दोन) :** [४]

i. भारताची सागरी सीमा
ii. पूर्व किनारी मैदानातील शेती
iii. पंजाबी संस्कृती

३. **(अ) खालील दिलेल्या सांख्यिकीय माहितीवरून विभाजित आयत तयार करा:** [२]

**भारत : शेती उत्पादन (खरीप) २०१०-११**

| **पिके** | **उत्पादन (शेकडेवारीमध्ये)** |
|---|---|
| तांदूळ (भात) | ४३ |
| अन्नधान्य | २० |
| कडधान्य | ०८ |
| तेलबिया | १४ |
| कापूस | १५ |
| **एकूण** | **१००** |

**(ब) आकृतीचे निरीक्षण करा व पुढील प्रश्नांची उत्तरे द्या (कोणतेही दोन) :** [२]




**प्रश्न:**

i. कोणत्या वाहन प्रकाराची सर्वाधिक विक्री झाली आहे?

ii. कोणत्या वाहन प्रकाराची सर्वांत कमी विक्री झाली?

iii. व्यापारी वाहनाची विक्री किती झाली?

iv. आकृतीला नाव लिहा.

**(क) तुम्हास पुरविलेल्या भारताच्या आराखड्यात खालील घटक दाखवा, तसेच त्यांची नावे लिहा व चिन्हांची सूची द्या (कोणतेही दोन) :** [२]

i. भारतातील सर्वाधिक उंच शिखर    ii. अरवली पर्वत

iii. राष्ट्रीय महामार्ग : मुंबई-अहमदाबाद-दिल्ली.    iv. नर्मदा नदी

४. **पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** [८]

i. हिमालयीन प्रदेशातील पर्यटन व्यवसायाची गुणवैशिष्ट्ये सांगा.

ii. तामिळनाडू किनाऱ्याविषयी सविस्तर माहिती लिहा.

iii. पर्जन्य जलसंचयनाच्या पारंपरिक पद्धती लिहा.

५. **रिकाम्या जागी योग्य तो पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा :** [२]

i. पर्याप्त लोकसंख्या, देशातील लोकसंख्येचे _______ आकारमान दर्शवते.

(आदर्श, न्यून, अतिरिक्त)

ii. अर्थव्यवस्थेतील उत्पादक उपक्रम मुख्यत: _______ भागात विभागले जातात.

(एक, दोन, तीन)

**६. पुढील प्रश्नांची प्रत्येकी एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन) :** **[६]**

i. श्रमप्रधान तंत्र कशास म्हणतात?

ii. भाववाढीचे आर्थिकेतर परिणाम कोणते?

iii. 'रोख निधी प्रमाण' म्हणजे काय?

iv. अन्नभेसळ म्हणजे काय?

v. सार्वजनिक वितरण प्रणालीची मुख्य उद्दिष्टे कोणती?

**७. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे पाच किंवा सहा वाक्यांत उत्तर लिहा :** **[४]**

i. व्यापारातील सर्वसामान्य गैरप्रकार कोणते?

ii. भाववाढीच्या नियंत्रणासाठी सरकारने योजलेले प्रत्यक्ष उपाय स्पष्ट करा.